N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S.(ठाणे):** पंढरपूर शहर **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0375 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 14/06/2022 17:37 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 14/06/2022

**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 14/06/2022

**Time From (वेळेपासून):** 11:25 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 12:20 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 14/06/2022 **Time (वेळ):** 17:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 023 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 14/06/2022 17:37 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 2 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** नवीन कराड नाका पंढरपूर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** पंढरपूर शहर

**District(State) (जिल्हा(राज्य)):** सोलापुर ग्रामीण(महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री नवनाथ शत्रुघ्न पाटील

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1989 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | गायगव्हाण,सांगोला,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | गायगव्हाण,सांगोला,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-8329411176

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | चंद्रकांत अभिमन्यू टोणपे | | | 1. नवीन कराड नाका जिजाऊ नगर , पंढरपुर,पंढरपूर शहर ,सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादी जबाब दि.14.06.2022 मी श्री नवनाथ शत्रुघ्न पाटील, वय-33 वर्षे, व्यवसाय- शेती, रा. गायगव्हाण, ता. सांगोला, जि.सोलापूर (8329411176) समक्ष फिर्यादी जबाब देतो की, मी वरील नमूद पत्यावर माझे कुटुंबासह राहण्यास असून शेती मधून येणाऱ्या उत्पन्नावर माझ्या कुटूंबाचा उदरनिर्वाह चालतो. मी माझे मौजे गायगव्हाण येथील गट नं.41 वर 32 आर क्षेत्रफळावर शेत जमीन आहे. सदरची शेती मी दोन वर्षापुर्वी विकत घेतलेली असून, सदरचा गट नं.41 वरील 30 आर जमीनलगत पंढरपूर मल्हारपेठ (कराड) हा हायवे रोड गेल्याने माझे रोड लगत असलेली जमीन बिगरशेती (एन.ए.) करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाची ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता असते. त्याकरिता मी सार्वजनिक बांधकाम विभाग सांगोला येथील कार्यालयात गेलो असता, तेथे माझा गट हा सार्वजनिक बांधकाम उप विभाग पंढरपूर यांच्या अंतर्गत येत असल्याचे सांगितले. त्यामुळे मा. उप विभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर यांच्याकडे दि.13.06.2022 रोजी माझी जमीन ही वाणिज्य व्यवसाय प्रयोजनासाठी बिगरशेती (एन.ए) करणेकामी अर्ज देण्यासाठी गेलो असता, सदर कार्यालयात मी माझ्या कामाविषयी माहिती विचारली असता, मला सार्वजनिक बांधकाम विभागाचे श्री. टोणपे यांना भेटण्यास सांगितले. त्यामुळे मी श्री. टोणपे यांना माझ्याकडील अर्ज दाखवून त्यांचाकडे दिला असता, त्यांनी तो अर्ज वाचून त्यांचेकडे घेवून त्याची पोहोच पावती दिली. त्यानंतर श्री.टोणपे यांना माझी शेत जमीन बिगरशेती (एन.ए) करण्याकरिता ना हरकत प्रमाणपत्र कधी मिळणार याबाबत विचारणा केली असता, श्री. टोणपे यांनी माझ्या कामाकरिता 30,000/- रुपये लागतील असे सांगितले. त्यावेळेस मी श्री. टोणपे साहेब यांना एवढे पैसे लागतात का असे विचारले असता त्यांनी वरिष्ठ अधिकारी यांना पैसे दयावे लागतात, त्याशिवाय ना हरकत प्रमाणपत्रावर सही होत नाही असे सांगितले. त्यामुळे मी श्री. टोणपे साहेबाना 30,000/- रुपये जास्त होतात थोडे कमी करा असे सांगुन माझे काम सुरु करण्यासाठी तात्पुरते स्वरुपात त्यांना 5,000/- रुपये दिले. त्यानंतर श्री. टोणपे साहेब हे माझ्या कामाकरिता मागत असलेले 30,000/- रुपयांबाबत इतरत्र माहिती घेतली असता ना हरकत प्रमाणपत्रासाठी कोणतीही रक्कम शासनाकडे भरावी लागत नसल्याची मला माहिती मिळाली. त्यामुळे श्री. टोणपे साहेब हे माझ्याकडे मागणी करीत असलेली रक्कम स्वत: करीता लाच म्हणून घेत असल्याचे मला खात्री झाली. त्यामुळे दि. 13/06/2022 रोजी सायंकाळी मी श्री. टोणपे साहेब यांच्याविरुध्द कारवाई करण्यासाठी ॲन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर येथील पोनि कोळी यांना फोनद्वारे संपर्क साधुन माझी तोंडी तक्रार सांगितली व ना हरकत प्रमाणपत्र घेणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग पंढरपूर येथे दि. 14.06.2022 रोजी जाऊन श्री. टोणपे साहेब यांची भेट घेणार असून त्यादिवशी आपण सार्वजनिक बांधकाम विभाग पंढरपूर येथे येऊन श्री. टोणपे साहेब यांचेवर कायदेशीर कारवाई करावी असे सांगितले. त्यावर पोनि कोळी यांनी मला दिनांक 14.06.2022 रोजी सकाळी 11.00 वा. पंढरपूर येथील मार्केट यार्ड येथे येवून थांबणेबाबत सांगितले. त्याप्रमाणे मी दिनांक 14.06.2022 रोजी सकाळी 11.00 वा. पंढरपूर येथील मार्केट यार्ड येथे येवून थांबलो. त्यावेळेस पोलीस निरीक्षक चंद्रकांत कोळी हे त्यांचे स्टाफसह तेथे शासकीय वाहनाने आले. त्यानंतर पोनि कोळी यांनी मला वाहनामध्ये बोलावून घेवून

त्यांची व तेथे उपलब्ध असलेल्या तहसिल कार्यालय मोहोळ या कार्यालयातील शासकीय पंच क्र.1 श्री. रणजित धुनावत व पंच क्र.2 श्री. झनकलाल नागलोत यांची ओळख करून दिली. त्यानंतर पोनि कोळी यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझे नाव गाव विचारले असता, मी माझे नाव गाव त्यांना सांगितले. त्यानंतर पोनि कोळी यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली असता, मी श्री. टोणपे साहेब यांचे विरूध्दची वरीलप्रमाणे तक्रार सांगितली. त्यानंतर पोनि कोळी यांचे सांगणेवरुन पंचासमक्ष मी माझी तक्रार लिहुन दिली. सदरची लेखी तक्रार पोनि कोळी व दोन्ही पंचानी वाचून त्यावर सह्या केल्या. त्यानंतर पोनि कोळी यांनी मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरवले. त्यासाठी आम्हास व्हईस रेकर्डर दाखवून त्याविषयी माहिती दिली व त्यामध्ये नवीन 8 जी.बी. चे मेमरी कार्ड टाकण्यात आले. त्यानंतर पोनि कोळी यांनी मी व माझ्या सोबत पंच नं 1 रणजित धुनावत यांना सुचना दिल्या की आम्ही सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयात जावून तेथे श्री. टोणपे साहेब यांची भेट घेवून त्यांच्याशी माझे कामाबाबत चर्चा करावी. त्यावेळी त्यांनी लाचेची मागणी केल्यास थोड्यावेळात आणून देत असल्याबाबत सांगावे, अश्या सविस्तर सुचना मला व पंच नं.1 रणजित धुनावत यांना दिल्या. त्यानंतर मला व पंच नं.1 रणजित धुनावत याना सार्वजनिक बांधकाम विभाग पंढरपूर कार्यालयाकडे माझ्या गळ्यात व्हईस रेकर्डर शर्टाचे आतील बाजूस चालु करुन आडकावून माझेकडील टोयाटो फरच्युनर एम एच 45 ए.एल 4588 या चारचाकी वाहनातुन पाठवले. त्यावरून मी, पंच नं 1 रणजित धुनावत यांच्यासह श्री. टोणपे साहेब यांची सार्वजनिक बांधकाम विभाग पंढरपूर कार्यालयात भेट घेण्यासाठी गेलो असता, सदर ठिकाणी श्री. टोणपे साहेब यांची भेट न झाल्याने माझा मोबाईल क्र.8329411176 वरुन श्री. टोणपे साहेब यांचा मोबाईल क्र. 9822426919 वर फोन केला असता, मला श्री टोणपे साहेब यांनी जुना कराड नाका येथे अतिक्रमण काढण्याचे काम चालु आहे त्या ठिकाणी या असे सांगितले. त्यामुळे मी व पचं क्र.1 रणजित धुनावत असे माझ्या वाहनातुन जुना कराड नाका येथे गेलो. सदर ठिकाणी मी श्री. टोणपे साहेबांना माझ्या कामाबाबत चर्चा करत असताना, श्री. टोणपे साहेब म्हणाले की, भेटल्या शिवाय काम होत नाही, त्यावर मी त्यांना मला काहीतर डिस्काऊंट दया असे म्हणालो असता, त्यावर श्री. टोणपे साहेब म्हणाले की, मी दुसऱ्यांकडून वीस हजार घेतो, त्यावर मी त्यांना आता किती दयायचे सांगा.. असे म्हणालो असता, श्री. टोणपे साहेब पंचवीस दया की.. असे म्हणाले, त्यावर मी पुन्हा एकदा किती देवू आता.. असे म्हणालो असता, श्री. टोणपे साहेब म्हणाले की, साहेबांचे दहा नंतर दया, आता पंधरा दया.., असे बोलुन इतर चर्चा करुन मी ए.टी.एम. मधुन आणुन देतो असे बोलुन मी व पंच न.1 रणजित धुनावत असे नियोजित ठिकाणी परत आलो. तेथे पोनि कोळी यांनी माझ्या गळ्यातील व्हईस रेकर्डर बंद करुन काढून पंच नं.1 रणजित धुनावत व मला हकीकत विचारून घेतली. त्यामध्ये आम्ही उपरोक्त प्रमाणे घडलेली हकीकत सांगितली. त्यानंतर पोनि कोळी यांनी व पंचांनी व्हईस रेकर्डरमध्ये माझ्यात व श्री. टोणपे साहेब यांच्यात झालेले संभाषण ऐकले. त्यामध्ये श्री. टोणपे साहेबांनी 15000/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर लगेच पोनि कोळी यांच्या सुचनेवरून मी श्री. टोणपे साहेब यांना देण्यासाठी माझ्याकडे असलेले 15000/- रूपये हजर केले. त्यात 500/- रूपये दराच्या 30 नोटा होत्या. मी हजर केलेल्या नोटांचे क्रमांक पोनि कोळी यांनी कोऱ्या कागदावर लिहुन घेवून त्याचेवर पोनि कोळी व दोन्ही पंचानी सदरच्या नोटांचे नंबर लिहिलेल्या कागदावर सह्या केल्या. सदर नोटांना ऍथ्रासीन पावडर लावण्याची, त्याचे प्रात्यक्षीक करण्याची कार्यवाही केली व सापळा कारवाईमध्ये करावयाच्या कामाच्या सुचना देवून सविस्तर सापळापूर्व पंचनाम्याची कार्यवाही शासकीय वाहन क्रमांक एम.एच.12 युसी 4108 मध्ये करण्यात आली. त्यानंतर यातील श्री. टोणपे साहेब यांच्यावर जुना कराड नाका येथे लाचेचा सापळा आयोजीत केला. त्यामध्ये मी व पंच नं 1 रणजित धुनावत असे दोघेजन माझ्या चारचाकी वाहनातुन व उर्वरीत सापळा पथक शासकीय वाहन क्रमांक एम.एच.12 युसी 4108 मधून जुना कराड नाका येथे आलो. सदर ठिकाणी श्री. टोणपे साहेब हे दिसुन न आल्याने मी त्यांच्या मोबाईल नंबरवर कल करुन कुठे आहे असे विचारले असता त्यांनी मला अतिक्रण काढत आम्ही वर ठाकरे चौक नविन कराड नाका येथे आलो असलेबाबत सागितले. त्यामुळे मी व पंच नं 1 रणजित धुनावत असे पुढे ठाकरे चौक नविन कराड नाका येथे जावून थांबलो असता, श्री. टोणपे साहेब यांनी माझी चारचाकी वाहन पाहून माझ्या वाहनाकडे येवून आतमध्ये घाई-घाईत बसुन मला त्यांचा उजव्या हाताचा अंगठा तर्जनीवर घासून पैसे देण्याचा ईशारा करुन लाच रक्कमेची मागणी केली. त्यावेळेस मी श्री. टोणपे साहेब यांना कालचे पाच हजार व हे पंधरा हजार मोजुन घ्या असे म्हणालो असता, त्यावर श्री. टोणपे साहेब हं असे म्हणून नोटा मोजून घेवून सदरचे लाच रक्कम 15000/- रुपये त्यांनी त्यांच्या अंगातील नेसत्या पन्टच्या डाव्या खिशात ठेवले. त्यावेळेस मी माझ्या चारचाकी वाहनातुन बाहेर येवून केलेल्या नियोजीत इशाऱ्यावरून सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी सदर ठिकाणी येवून पोनि कोळी यांनी माझ्या गळयातील व्हाईस रेकर्डर बंद करुन ताब्यात घेतला व माझ्या वाहनात बसलेले श्री. टोणपे साहेब यांना ताब्यात घेतले.त्यानंतर पोनि कोळी यांनी ठाकरे चौक नविन कराड नाका येथे शासकीय वाहनात दोन्ही पंचासमक्ष सदर इसमाचे दोन्ही हातांची, कपडयाची पुरेसा अंधार करून अ.वा. दिव्याच्या निळे प्रकाशात तपासणी केली असता त्यांचे उजव्या हाताच्या बोटाच्या पेऱ्यांवर व अंगावरील नेसते पन्टच्या डाव्या बाजुच्या खिश्याच्या आतील बाजूस व तोंडास अ.पा.ची निळसर चकाकी दिसून आली. तसेच त्यांचेकडे मिळून आलेल्या नोटांची कागदावर नमूद केलेल्या नोटांच्या नंबरांशी पडताळणी करता ते तंतोतंत मिळून आले. सदर नोटांची देखील ऍ.वा.दिव्याचे निळ्या प्रकाशात तपासणी करता त्या नोटांवर देखील अ.पा.ची निळसर चकाकी दिसून आली. पोनि कोळी यांनी सदर इसमास त्याचे नांव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नांव चंद्रकांत अभिमन्यू टोणपे, वय 58 वर्षे, पद-भांडार कारकुन, उप विभागीय अभियंता कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर, जि. सोलापूर असे सांगितले. त्यानंतर पोनि कोळी यांनी चंद्रकांत अभिमन्यू टोणपे यांच्या ताब्यातुन घेतलेल्या सदरच्या नोटा व चंद्रकांत अभिमन्यू टोणपे यांनी लाचेची रक्कम ठेवलेली पन्ट पुराव्याकामी जप्त करण्यात आलेली आहे. सदरबाबत सविस्तर पडताळणी, सापळापूर्व व यशस्वी सापळा पंचनामा शासकीय विश्राम गृह, पंढरपूर येथे दि. 14.06.2022 रोजी पूर्ण करण्यात आलेला आहे. तरी दि. 14.06.2022 रोजी 11.25 वा ते दिनांक 14.06.2022 रोजीचे 12.20 वा. दरम्यान चंद्रकांत अभिमन्यू टोणपे, पद-भांडार कारकुन यांनी आपले लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून त्यांना कायद्याने मिळावयाचे त्या खेरीज लाच म्हणून माझे वाणिज्य प्रयोजनासाठी बिगरशेती (एन.ए) करणेकामी ना हरकत प्रमाणपत्र देणेकामी 30,000/- रूपये लाचेची मागणी करून, तडजोडी अंती 15000/- रुपये लाचेची रक्कम चंद्रकांत अभिमन्यू टोणपे, पद-भांडार कारकुन यांनी स्वत: स्विकारून लोकसेवक चंद्रकांत अभिमन्यू टोणपे यांनी सांपत्तीक फायदा मिळवुन गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले आहे म्हणुन माझी चंद्रकांत अभिमन्यू टोणपे, वय 58 वर्षे, पद-भांडार कारकुन, उप विभागीय अभियंता कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंढरपूर, जि. सोलापूर, रा. गट नं.54, प्लट नं.57, जिजाऊ नगर, नविन कराड नाका पंढरपूर, ता. पंढरपूर, जि.सोलापूर यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम अन्वये फिर्याद आहे. माझा वरील फिर्यादी जबाब हा आपले कडील असलेल्या लपटपवर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रींट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे. हा जबाब दिला स.ता.म समक्ष (चंदकांत कोळी) पोलीस निरीक्षक ऍन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर

13.Action
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)
Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at

(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Arun Ramchandra Pawar(I (Inspector)) / AIOPP7809G or (किंवा)

(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):
Rank (पद):
No.(क्र.):
to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
District (जिल्हा):
on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14.Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पंढरपूर शहर

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची
Name (नाव): Arun Ramchandra Pawar
Rank(पद): I (Inspector)
No.(सं.): AIOPP7809G